**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२.**
**स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वहका-२०१८/प्र.क्र.३३/का-१४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ०५ मे, २०१८

**वाचा -**

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२.
२) आदिवासी विकास विभाग शासन निर्णय, क्र. बैठक-२०१३/प्र.क्र.२७२/का-१४, दि. ५ मार्च, २०१४
३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. बैठक-२०१३/प्र.क्र.२७२/का-१४,दि. १२ जून, २०१५
४) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. वहका-२०१४/प्र.क्र.६६/का-१४, दि. २४ जून, २०१५.
५) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. वहका-२०१५/प्र.क्र.११०/का-१४, दि. ६ जानेवारी, २०१६
६) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. वहका-२०१६/प्र.क्र.८२/का-१४, दि. १ ऑक्टोबर, २०१६
७) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०१७/प्र.क्र.४५/का-१९, दि. १९ ऑगस्ट, २०१७ व दि. ३० डिसेंबर, २०१७.
८) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. वहका-२०१८/प्र.क्र.१३/का-१४, दि. १७ फेब्रुवारी, २०१८
९) आदिवासी विकास विभाग पत्र क्र. बैठक-२०१३/प्र.क्र.२७२/का-१४, दि. १३ ऑक्टोंबर, २०१७
१०) आदिवासी विकास विभाग पत्र क्र. बैठक-२०१३/प्र.क्र.२७२/का-१४, दि. २३ फेब्रुवारी, २०१८
११) आदिवासी विकास विभागाचा आदेश क्र.आस्था-२०१८/प्र.क्र.८८/का-१, दि.१३ एप्रिल, २०१८

**प्रस्तावना -**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८आणि सुधारित नियम, २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरिता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क; निस्तार सारखे हक्क; गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे त्यासाठी सामूहिक वन हक्क ग्रामसभांना प्राप्त झाल्यामुळे त्यांना मिळालेल्या वन जमिनींचा निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

अनुसूचित जमातीचे वननिवासी व इतर पारंपारीक वननिवासी यांच्या फायद्यासाठी अशा सामुहिक वनसंपत्तीचे निरंतर व समसमान व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामसभेचे बळकटीकरण करण्याकरिता तसेच वनांवर उपजीविका अवलंबून असलेल्या ग्रामीण समाजाला निरंतर व शाश्वत उपजिविका साधन उपलब्ध करुन देणे, वनांचे व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, संरक्षण व पुनर्निमाणाकरीता परिणामकारक व कार्यक्षम व्यवस्थापन पध्दत

अवलंबिण्यासाठी संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम- केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालय (UNDP-MOTA) पथदर्शी प्रकल्पाअंतर्गत "खोज" संस्थेमार्फत राज्यातील नागपूर, गडचिरोली, अमरावती, गोंदिया व यवतमाळ या ५ जिल्ह्यातील ५० गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याची योजना हाती घेण्यात आली होती. अशा पथदर्शी प्रकल्पांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या दहाव्या बैठकीमध्ये संदर्भ क्र. १० अन्वये निश्चित झाल्यानुसार स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने राज्यातील ६७ गावांकरीता सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>-**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मधील कलम ३ (१) अन्वये मंजूर सामूहिक वनहक्कांचे UNDP- MOTA पथदर्शी प्रकल्पाच्या धर्तीवर**"परिशिष्ट अ"** मध्ये दर्शविलेल्या (१) विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, नागपूर, (२) लोकसमन्वय प्रतिष्ठान, नंदुरबार, (३) नवी उमेद संस्था, पांढरकवडा, (४) श्री गुरूदेव सेवा भजन मंडळ, चंद्रपुर (५) ग्राम आरोग्य घाटी, गडचिरोली (६) खोज, अचलपुर, जि. अमरावती या स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने गडचिरोली, गोंदीया, नंदुरबार, चंद्रपुर, नांदेड व अमरावती या जिल्ह्यांतील ६७ गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याच्या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. **"परिशिष्ट ब"** मधील अंदाजपत्रकात दर्शविण्यात आलेल्या कामांकरीता परिशिष्ट-अ मध्ये नमूद केलेल्या ६७ गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याकरिता (१) विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, नागपूर, (२) लोकसमन्वय प्रतिष्ठान, नंदुरबार, (३) नवी उमेद संस्था, पांढरकवडा, (४) श्री गुरूदेव सेवा भजन मंडळ, चंद्रपुर (५) ग्राम आरोग्य घाटी, गडचिरोली (६) खोज, अचलपुर, जि. अमरावती यांना एकूण रु. १,१९,२३,०६५ ( रुपये एक कोटी एकोणीस लाख तेवीस हजार पासष्ठ फक्त ) इतक्या खर्चास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थेच्या जबाबदारीमध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा / कामांचा समावेश असेल:-

१) सदर योजनेची मुख्य अंमलबजावणी धारक म्हणून "परिशिष्ट-अ" मध्ये दर्शविलेल्या स्वयंसेवी संस्था त्यांच्याशी संबंधित असलेल्या गावांच्या बाबतीत काम पाहतील व शासनासोबत समन्वय साधतील.

२) सदर योजनेंतर्गत सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीचे [वनहक्क कायदा नियम ४ (१) (ङ)] गठन करणे, सदर समितीच्या सदस्यांना प्रशिक्षण, कार्यशाळा आयोजन (क्षमतावृध्दी), समितीच्या सदस्यांना माहितीदर्शक सहल ( Exposure visit), मंजूर सामूहिक वनहक्क जमीनीचे सर्वेक्षण; भूमापन करुन अभिलेख तयार करणे, संवर्धन व व्यवस्थापन आराखडयाविषयी ग्रामसभेमध्ये चर्चा घडवून ग्रामसभांमार्फत आराखड्यामध्ये समाविष्ट करावयाचे कामे ठरविणे, त्याविषयी कार्यवाहीची पध्दत ठरविणे आणि संवर्धन व व्यवस्थापन आराखडा तयार करुन ग्रामसभेपुढे मांडणे, इतर विभागांच्या सुचना विचारात घेणे व त्याबाबत ग्रामसभेत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने फेरबदल व एकत्रिकरणासह सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडयात समाविष्ट करुन आराखडयास अंतिमत: ग्रामसभेची मंजूरी घेणे इ. बाबींचा प्रामुख्याने समावेश राहील.

३) अनुसूचित जमाती, इतर पारंपारिक वन निवासी ( वन हक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ मधील तरतूदींनुसार तसेच शासनासमवेत केलेल्या योजनेच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार सदर योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित स्वयंसेवी संस्थांवर राहील.

४) संस्थांच्या सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित स्वयंसेवी संस्थांनी आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडे सादर करावे.

५) या योजनेच्या अंमलबजावणीविषयी संपूर्ण अभिलेख जतन करण्याची व शासनामार्फत वेळोवेळी मागणी केल्यानुसार माहिती सादर करण्याची तसेच राज्यस्तरीय सुकाणू समितीस सदर योजनेचा त्रैमासिक प्रगती अहवाल सादर करण्याची जबाबदारी संबधित स्वयंसेवी संस्थांवर राहील.

४. प्रस्तूत योजनेच्या अंमलबजावणीकरीता **"परिशिष्ट-अ"** मधील गावांशी सबंधित असलेली स्वयंसेवी संस्था आणि शासनाच्या वतीने आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामध्ये करारनामा करण्यात यावा.

५. सदर योजनेच्या अंमलबजावणीवर आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे नियंत्रण राहील. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी स्वयंसेवी संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा दर तीन महिन्यांनी आढावा घेऊन प्रगतीबाबत राज्य शासनास अवगत करावे.

६. प्रस्तुत योजनेचा कालावधी अठरा महिन्यांचा असेल. या योजनेंतर्गत निधीचे वितरण सांमजस्य करारानुसार कामाच्या प्रगतीनुसार टप्प्याटप्प्याने संबंधित स्वयंसेवी संस्थेस करण्यात येईल.

७. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी प्रस्तुत शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या अ.क्र. १ ते ३१ व ३३ ते ६७ येथील एकूण ६६ गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी संबंधित स्वयंसेवी संस्थांना मंजूर अनुदानातून पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करावा. अनुक्रमांक ३२ येथील भगदरी या गावाचे टायटल व ग्रामसभेचा ठराव लोकसमन्वय प्रतिष्ठान, नंदुरबार या स्वयंसेवी संस्थेने आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना सादर करावा. प्रस्तुत गावाचे टायटल व ग्रामसभेचा ठराव प्राप्त झाल्यानंतरच आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी संबंधित स्वयंसेवी संस्थेला मंजूर अनुदानातून पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करावा.

८. प्रस्तुत योजनेवरील खर्च विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून संदर्भ क्र. ७ अन्वये प्राप्त झालेल्या अनुदानातून भागविण्यांत यावा

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१८०५०५१७४१०७२१२४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Mahadu Raut

Digitally signed by Pandurang Mahadu Raut
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=136cc102e03660c61e3577e800c6edb8125d21d6c9d7742a980d024e919fa85c, cn=Pandurang Mahadu Raut
Date: 2018.05.05 17:45:20 +05'30'

**( पांडुरंग म. राऊत )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (कृषी व पदुम), मंत्रालय, मुंबई
७. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
९. महालेखापाल (लेखा परिक्षा), १/२, महाराष्ट्र मुंबई/नागपूर
१०. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
११. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,नाशिक
१२. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर,अमरावती
१३. जिल्हाधिकारी, पालघर, ठाणे, नंदुरबार, जळगांव, गोंदीया, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, पालघर, ठाणे, नंदुरबार, जळगांव, गोंदीया, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली

१५. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१६. डॉ. माधव गाडगीळ, वन व जैव विविधता व्यवस्थापन अभ्यास केंद्र, ए-१८, स्प्रिंगफ्लॉवर्स, पंचवटी, पाषाण, पुणे
१७. श्री. ब्रायन लोबो, सृजन संस्था, एम.व्ही. सुपरमार्केट, कचेरी रोड, पालघर
१८. श्री. मोहन हिराबाई हिरालाल, वृक्षमित्र गडचिरोली-चंद्रपूर, शेंडे प्लॉट, रामनगर, चंद्रपूर, जि. चंद्रपूर
१९. डॉ. सतीश गोगुलवार, आम्ही आमच्या आरोग्यासाठी, मु.पो.ता.कुरखेडा, गडचिरोली
२०. श्री. दिलीप गोडे, विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, बी-४०१, गौंडवाना ध्रुव अपार्टमेंन्ट, के. टी. नगर, नागपूर
२१. श्रीम. इंदवी तुळपुळे, वन निकेतन, मु. पो. ताल, ता. मुरबाड, जि. ठाणे.
२२. श्री.केशव गुरनुले ,सृष्टी संस्था, येरंडी, पो.गोठणगाव, ता. कुरखेडा गडचिरोली
२३. श्री. विजय देढे , पर्यावरण मित्र विरुर स्टेशन, ता. राजूरा, जि.चंद्रपूर
२४. श्रीम. प्रतिभा शिंदे, लोकसमन्वय प्रतिष्ठान,"बिरसा भवन" प्लॉट नं. ४४, विक्रम नगर, तळोदा, जि. नंदुरबार
२५. श्रीमती पूर्णिमा उपाध्याय, खोज, यशवंत भवन, मु.पो.गौरखेडा (कुंभी), ता. अचलपूर, जि. अमरावती.
२६. श्री. अरुण शिवकर, साकव पेण प्रकल्प, मु. देवळी, पो. खारपाले, ता.पेण, जि. रायगङ
२७. श्री. दत्ता पाटील, युवा ग्रामीण, गोंदीया
२८. श्री. किशोर मोघे, ग्रामीण समस्या मुक्ती ट्रस्ट, यवतमाळ
२९. श्री. रुपचंद दखने, ग्रामीण आरोग्य, कुरखेडा,गडचिरोली
३०. संबंधित ग्रामसभा/ ग्रामपंचायती
३१. कक्ष अधिकारी ( का.१९ ) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.३२
३२. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२.
३३. निवडनस्ती (का.१४) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. वहका-२०१८/प्र.क्र. ३३./का-१४, दि. ०५ मे, २०१८ सोबतचे**

**"परिशिष्ट-अ"**

अनुसूचित जमाती, इतर पारंपारिक वन निवासी ( वन हक्काची मान्यता) अधिनियम,२००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ अंतर्गत मंजूर झालेल्या खालील गावांमध्ये सामूहिक वनहक्कांचे (१) विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, नागपूर, (२) लोकसमन्वय प्रतिष्ठान, नंदुरबार, (३) नवी उमेद संस्था, पांढरकवडा, (४) श्री गुरूदेव सेवा भजन मंडळ, चंद्रपुर (५) ग्राम आरोग्य घाटी, गडचिरोली (६) खोज, अचलपुर, जि. अमरावती या **स्वयंसेवी संस्थेच्या** सहायाने सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे, अशा गडचिरोली, गोंदीया, नंदुरबार, चंद्रपुर, नांदेड व अमरावती जिल्ह्यातील ६७ गावांची नांवे:-

| **अ.क्र.** | **स्वयंसेवी संस्थेचे नांव** | **गावाचे नांवे** | **तालुका** | **जिल्हा** | **सामुहीक वनहक्काचे क्षेत्र (हे.)** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ५ | ६ | ७ |
| १ | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, नागपुर **एकूण २५ गावे** | फुक्कीमेटा | देवरी | गोंदीया | ४३१.८५ |
| २ | | पळसगाव (चुटीया) | देवरी | गोंदीया | ४९४.५५ |
| ३ | | ढोढरा | देवरी | गोंदीया | २८.१९ |
| ४ | | ढिवरीनटोला | देवरी | गोंदीया | ४०४.७६ |
| ५ | | सुकडी | देवरी | गोंदीया | ४३९.१५ |
| ६ | | पदमपूर | देवरी | गोंदीया | १०९.४४ |
| ७ | | शिरपूर बांध | देवरी | गोंदीया | ९७.८५ |
| ८ | | घोनाडी | देवरी | गोंदीया | ४७४.६४ |
| ९ | | शेरपार | देवरी | गोंदीया | ५८४.६६ |
| १० | | डवकी | देवरी | गोंदीया | १२८.९१ |
| ११ | | पींडकेपार | देवरी | गोदीया | २३०.४१ |
| १२ | | पळसगाव (राका) | सडक अर्जुनी | गोंदीया | ६०४.३७ |
| १३ | | कोकणा /जमी | सडक अर्जुनी | गोंदीया | १३०९.५२ |
| १४ | | कोसमतोंडी | सडक अर्जुनी | गोंदीया | ४२३.५८ |
| १५ | | कन्हारपायली | सडक अर्जुनी | गोंदीया | १२४६.७४ |
| १६ | | पिसेवडधा | आरमोरी | गडचिरोली | ३०३.०६ |
| १७ | | कोसरी | आरमोरी | गडचिरोली | ४७६.७२ |
| १८ | | नरचुली | आरमोरी | गडचिरोली | ४२९.४७ |
| १९ | | दवंडी | आरमोरी | गडचिरोली | ९२.१७ |
| २० | | भानसी | आरमोरी | गडचिरोली | १९७.३० |
| २१ | | खडकी | आरमोरी | गडचिरोली | १८४.४९ |
| २२ | | वानरचुवा | आरमोरी | गडचिरोली | १७४.६७ |
| २३ | | उमरी | आरमोरी | गडचिरोली | १२७.५५ |
| २४ | | जांभळी | आरमोरी | गडचिरोली | २५४.१३ |
| २५ | | खारडी | आरमोरी | गडचिरोली | ७५.२६ |
| २६ | लोकसमन्वय प्रतिष्ठान, नंदूरबार **एकूण ७ गावे** | सिंधि दिगर | धडगांव | नंदुरबार | २६२९.५२ |
| २७ | | बुरुमपाडा | घडगांव | नंदुरबार | ७०६.३३ |
| २८ | | खाई | अक्कलकुवा | नंदुरबार | १००.०० |
| २९ | | गुलीआंबा | अक्कलकुवा | नंदुरबार | ९९.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३० | | कुंडी | अक्कलकुवा | नंदुरबार | २००.०० |
| ३१ | | मालदा | तळोदा | नंदुरबार | १५६.३१ |
| ३२ | | भगदरी | अक्कलकुवा | नंदुरबार | |
| ३३ | अक्षयसेवा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, मेंडकी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर **एकूण ३ गावे** | एकारा | ब्रम्हपुरी | चंद्रपूर | १३१.२४ |
| ३४ | | शिवसागर तुकूम | ब्रम्हपुरी | चंद्रपूर | २४०.८९ |
| ३५ | | अडयाळ तू. | ब्रम्हपुरी | चंद्रपूर | २८६.५२ |
| ३६ | नवी उमेद संस्था, पांढरकवडा ता. केळापूर, जि.यवतमाळ **एकूण ३ गावे** | पळशीडाग | किनवट | नांदेड | ६५.८७ |
| ३७ | | काजीपोड | किनवट | नांदेड | २९० |
| ३८ | | जरुर | किनवट | नांदेड | ६८७.९० |
| ३९ | श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ, चिमूर, ता. चिमूर, जि. चंद्रपूर **एकूण ३ गावे** | मदनापूर | चिमूर | चंद्रपूर | १७०.६३ |
| ४० | | विहीरगांव | चिमूर | चंद्रपूर | ८३४.५९ |
| ४१ | | चैती तुकूम | चिमूर | चंद्रपूर | १८४.८२ |
| ४२ | ग्राम आरोग्य घाटी, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली **एकूण ६ गावे** | कोसी | कुरखेडा | गडचिरोली | २०७.०३ |
| ४३ | | पिटेसुर | कुरखेडा | गडचिरोली | ३७९.९६ |
| ४४ | | खेडेगाव | कुरखेडा | गडचिरोली | ३३७.१६ |
| ४५ | | कराडी | कुरखेडा | गडचिरोली | १४४.५८ |
| ४६ | | सावलखेडा | कुरखेडा | गडचिरोली | २६१.७९ |
| ४७ | | भगवानपूर | कुरखेडा | गडचिरोली | २८३.८५ |
| ४८ | खोज, अचलपूर, जि. अमरावती. **एकूण २० गावे** | सोलामहू | चिखलदरा | अमरावती | ५०.०० |
| ४९ | | चिचाटी | चिखलदरा | अमरावती | २२९.४४ |
| ५० | | आमझरी | चिखलदरा | अमरावती | २२०.५७ |
| ५१ | | खटकाली | चिखलदरा | अमरावती | १८४.९ |
| ५२ | | रुईपठार | चिखलदरा | अमरावती | २४०.०० |
| ५३ | | भुत्रुम | चिखलदरा | अमरावती | २२०.०० |
| ५४ | | सावरपाणी | चिखलदरा | अमरावती | ५३४.१४ |
| ५५ | | खिरपाणी | चिखलदरा | अमरावती | ६६७.३९ |
| ५६ | | काकादरी | चिखलदरा | अमरावती | १७०.२० |
| ५७ | | पिपादरी | चिखलदरा | अमरावती | २०१.९० |
| ५८ | | हिरदा | चिखलदरा | अमरावती | २०६.६५ |
| ५९ | | राहू | चिखलदरा | अमरावती | १३६७.३३ |
| ६० | | कामापुर | चिखलदरा | अमरावती | १६१.९७ |
| ६१ | | पांढराखडक | चिखलदरा | अमरावती | २५२.९१ |
| ६२ | | बोरधा | चिखलदरा | अमरावती | ११२.३३ |
| ६३ | | कालापाणी | चिखलदरा | अमरावती | १००.०० |
| ६४ | | ढोमणबरडी | चिखलदरा | अमरावती | ५२.०० |
| ६५ | | हिरदामल | चिखलदरा | अमरावती | २९१.४० |
| ६६ | | डोमी | चिखलदरा | अमरावती | २२०.०० |
| ६७ | | कुही | चिखलदरा | अमरावती | २२०.०० |

Pandurang Mahadu Raut

Digitally signed by Pandurang Mahadu Raut
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=136cc102e03660c61e3577e800c6edb8125d21d6c9d7742a980d024e919fa85c, cn=Pandurang Mahadu Raut
Date: 2018.05.05 17:46:17 +05'30'

**( पांडुरंग म. राऊत )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. वहका-२०१८/प्र.क्र. ३३./का-१४, दि. ०५ मे, २०१८ सोबतचे**

**"परिशिष्ट-ब"**

अनुसूचित जमाती, इतर पारंपारिक वन निवासी ( वन हक्काची मान्यता) अधिनियम,२००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ अंतर्गत मंजूर झालेल्या खालील गावांमध्ये सामूहिक वनहक्कांचे स्वयंसेवी संस्थेच्या सहायाने सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी संबंधित **स्वयंसेवी संस्थेला निधी** उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील अंदाजपत्रक :-

| अ.क्र | बाब | दर | एकूण रक्कम रूपये | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विदर्भ निसर्ग संरक्षण संस्था, नागपूर यांच्या संस्थेच्या २५ गावांसाठी | लोकसमन्वय प्रतिष्ठान, तळोदा यांच्या संस्थेच्या ७ गावांसाठी | अक्षयसेवा बहुउद्देशीय सामाजिक संस्था, मेंडकी, ता. ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर ३ गावांसाठी | नवी उमेद संस्था, पांढरकवडा ता. केळापूर, जि.यवतमाळ ३ गावांसाठी | श्री गुरुदेव सेवा भजन मंडळ, चिमूर, ता. चिमूर, जि. चंद्रपूर ३ गावांसाठी | ग्राम आरोग्य घाटी, ता. कुरखेडा, जि. गडचिरोली ६ गावांसाठी | खोज, अचलपूर, जि. अमरावती. २० गावांसाठी |
| | **अ- सामुहिक संघटन व क्षमता बांधणी** | | | | | | | | |
| १ | सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण व क्षमता वृध्दी | ३०,००० | ७,५०,००० | २१०,००० | ९०,००० | ९०,००० | ९०,००० | १८०,००० | ६,००,००० |
| २ | माहिती दर्शक भेट (Exposure Visit) ( साधरणत: गावनिहाय ३ सदस्य व १० गावांमागे १ समन्वयक) | १,५०० | १,१७,०००<br>( १५००x ७८ ) | ३३,००० | १५,०००<br>( १५००x १०) | १५,०००<br>( १५००x १०) | १५,०००<br>( १५००x १०) | २८,५०० | ९३,०००<br>( १५००x ६२) |
| | **एकूण (अ)** | | **८,६७,०००** | **२,४३,०००** | **१,०५,०००** | **१,०५,०००** | **१,०५,०००** | **२,०८,५००** | **६,९३,०००** |
| | **ब- व्यवस्थापन आराखडे तयार करणे** | | | | | | | | |
| १ | नकाशे, साहित्य खरेदी | ३,५०० | ८७,५०० | २४,५०० | १०,५०० | १०,५०० | १०,५०० | २१,००० | ७०,००० |
| २ | गावकरी व संबंधित क्षेत्रिय अधिकारी जन जागृती (sensitization) | ८,५०० | २,१२,५०० | ५९,५०० | २५,५०० | २५,५०० | २५,५०० | ५१,००० | १,७०,००० |
| ३ | वन जमिन सर्वेक्षण व स्टॉक मॅपिग | २५,००० | ६,२५,००० | १७५,००० | ७५,००० | ७५,००० | ७५,००० | १५०,००० | ५,००,००० |
| ४ | सामाजिक - आर्थिक सर्वेक्षण | १०,००० | २,५०,००० | ७०,००० | ३०,००० | ३०,००० | ३०,००० | ६०,००० | २,००,००० |
| ५ | माहिती संगणकीकरण | १०,००० | २,५०,००० | ७०,००० | ३०,००० | ३०,००० | ३०,००० | ६०,००० | २,००,००० |
| ६ | जीपीएस खरेदी (५ गावांमध्ये १ ) | ८,००० | ४०,०००<br>( ८०००x ५) | ८,००० | ८,०००<br>( ८०००x १) | ८,०००<br>( ८०००x १) | ८,०००<br>( ८०००x १) | ८,००० | ३२,०००<br>( ८०००x ४) |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | व्यवस्थापन आराखडे करीता तांत्रिक सहाय्य | ३०,००० | ७,५०,००० | २१०,००० | ९०,००० | ९०,००० | ९०,००० | १८०,००० | ६,००,००० |
| ८ | व्यवस्थापन आराखडे छपाई | ५,००० | १,२५,००० | ३५,००० | १५,००० | १५,००० | १५,००० | ३०,००० | १,००,००० |
| | **एकूण (ब)** | | **२३,४०,०००** | **६,५२,०००** | **२,८४,०००** | **२,८४,०००** | **२,८४,०००** | **५,६०,०००** | **१८,७२,०००** |
| | **क- कार्यालयीन व प्रशासकीय खर्च** | | | | | | | | |
| १ | प्रकल्प कर्मचारी नियुक्ती, प्रशिक्षण, प्रवास, बैठक, दुरध्वनी, स्टेशनरी, ऑडिट इ. अनुषंगीक खर्च, | | १०,२६,२४० | २८६,४०० | १,२४,४८० | १,२४,४८० | १,२४,४८० | २४५,९२० | ८,२०,८०० |
| | **एकूण प्रकल्प खर्च ( अ+ब+क)** | | **४२,३३,२४०** | १,१८१,४०० | **५,१३,४८०** | **५,१३,४८०** | **५,१३,४८०** | १,०१४,४२० | **३३,८५,८००** |
| | **ड- व्यवस्थापन मुल्य ( प्रकल्प खर्चाच्या ५ %** | | २,११,६६२ | ५९,०७० | २५,६७४ | २५,६७४ | २५,६७४ | ५०,७२१ | १,६९,२९० |
| | **एकूण खर्च ( अ+ब+क+ड )** | | **४४,४४,९०२** | **१२,४०,४७०** | **५,३९,१५४** | **५,३९,१५४** | **५,३९,१५४** | **१०,६५,१४१** | **३५,५५,०९०** |

Pandurang Mahadu Raut

Digitally signed by Pandurang Mahadu Raut
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=136cc102e03660c61e3577e800c6edb8125d21d6c9d7742a980d024e919fa85c, cn=Pandurang Mahadu Raut
Date: 2018.05.05 17:47:31 +05'30'

( पांडुरंग म. राऊत )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन